

ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

K/471

वर्ष : ११ वे अंक : १ ला
एप्रिल, मे, जून २०२०

## समकालीन कथा व व्यावहारिक मराठी विशेषांक

UGC CARE Listed Journal
ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13 /1/2009-TC

## समकालीन कथा व व्यावहारिक मराठी विशेषांक

वर्ष - ११ वे, अंक पहिला
(एप्रिल-मे-जून २०२०)

संपादक
डॉ. शिवाजी हुसे
अतिथी संपादक
डॉ. राजेंद्र थोरात डॉ. राहुल पाटील
संपादक मंडळ
डॉ. सर्जेराव जिगे
डॉ. फुला बागुल
डॉ. अनिल गर्जे
डॉ. संजय भालेराव
डॉ. ताहेर पठाण
डॉ. वंदना महाजन
डॉ. प्रकाश खेत्री
डॉ. ममता इंगोले
डॉ. वामन जाधव
डॉ. यशवंत सोनुने
डॉ. रामचंद्र झाडे
मूल्यमापन समिती
डॉ. संजय नगरकर
डॉ. भास्कर ढोके
डॉ. जया कदम
डॉ. सुभाष बागल
डॉ. संदीप सांगळे

मूल्य : १५० रुपये

SHRI PADMAMANI ... COLLEGE Pabal Tal.Shirur Dist.Pune

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातून अनुदान प्राप्त झाले आहे. परंतु या नियतकालिकांत प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३, मोबा. ९४०४०००३९८

१. मराठी कथा: संव
डॉ. नाना झगडे.
२. मराठी कथेची वा
डॉ. श्रीराम गडव
३. कथेचे घटक व प्र
डॉ. संजय शिंदे..
४. कथेचा आस्वाद
डॉ. राजेंद्र थोरात
५. विचारप्रवृत्त व अंत
'जेव्हा मी जात चो
डॉ. विजय बालघ
६. शेतकऱ्यांची व्यथा
डॉ. विजय केसक
७. विचार आणि चिंतन
डॉ. वर्षा तोडमल
८. विद्रोहाला शक्ती व
डॉ. महादेव कांबळे
९. प्रस्थापित व्यवस्थेल
डॉ. प्रवीण ... -
१०. आदिवासींच्या व्यथा,
डॉ. कैलास महाले
११. मुक्या सुरांचा 'बाजा
डॉ. हनुमंत भवारी .
१२. वैद्यकीय पेशातील प्र
'दगड दवाखाना' /
डॉ. राहुल जगदाळे

Journal
73X
ना वाहिलेले त्रैमासिक
1/2009-TC
क मराठी विशेषांक
पहिला
२०,
ुरे
क
. राहुल पाटील
डॉ. ममता इंगोले
डॉ. वामन जाधव
डॉ. यशवंत सोनुने
डॉ. रामचंद्र झाडे
ती
र
मत असतीलच असे नाही.
मंडळातून अनुदान प्राप्त झाले आहे.
स मान्य असतीलच असे नाही.
नी, हिवरखेडा रोड, कन्नड,
९४०४०००३९८

# - अनुक्रमणिका -

१. मराठी कथा: संकल्पना व स्वरूप /
डॉ. नाना झगडे........................................ ९

२. मराठी कथेची वाटचाल /
डॉ. श्रीराम गडकर..................................... १९

३. कथेचे घटक व प्रकार /
डॉ. संजय शिंदे........................................ ३२

४. कथेचा आस्वाद हा आनंदानुभव /
डॉ. राजेंद्र थोरात....................................... ३९

५. विचारप्रवृत्त व अंतर्मुख करणारी कथा
'जेव्हा मी जात चोरली होती' /
डॉ. विजय बालघरे..................................... ४४

६. शेतकऱ्यांची व्यथा मांडणारी वास्तव कथा 'लाल चिखल' /
डॉ. विजय केसकर...................................... ५६

७. विचार आणि चिंतनाचा पाऊस : 'पाऊस आला मोठा' /
डॉ. वर्षा तोडमल ....................................... ६१

८. विद्रोहाला शक्ती व व्यापकता देणारी कथा - 'उठावण' /
डॉ. महादेव कांबळे..................................... ६७

९. प्रस्थापित व्यवस्थेला इशारा देणारी कथा - 'उठावण' /
डॉ. प्रवीण ताटे - देशमुख............................ ७२

१०. आदिवासींच्या व्यथा, वेदना व संघर्षाचे दर्शन : 'बाजा' /
डॉ. कैलास महाले ...................................... ८२

११. मुक्या सुरांचा 'बाजा' /
डॉ. हनुमंत भवारी ................................. ९१

१२. वैद्यकीय पेशातील प्रवृत्तींवर प्रकाश टाकणारी कथा
'दगड दवाखाना' /
डॉ. राहुल जगदाळे ................................. १००

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE
Pabal
Tal.Shirur
Dist.Pune

ज्ञाणिवांमुळे या निसर्ग जाणिवा बाजा'
. हे या कथेचे वेगळेपण म्हणावे लागेल.
त्री ओळखही वाचकांना होते. एकूणच,
ही कथा समकालीन कथेत यामुळे वेगळी

य: चिंतन आणि चिकित्सा', दिलीपराज

त गोंडवाना गोंडी साहित्य परिषद प्रकाशन,

फेसबुक पेज

ЖЖ

# ११. मुक्या सुरांचा 'बाजा'


– डॉ. हनुमंत भवारी –

श्री. पद्ममणि जैन महाविद्यालय, पाबळ, ता. शिरूर, जि. पुणे

ई–मेलः hlbhawari@gmail.com भ्रमणध्वनी : ९७६४२८४०३२


**प्रास्ताविक :**

लेखिका उषाकिरण आत्राम यांच्या 'अहेर' या कथासंग्रहातील 'बाजा' या कथेचा समावेश, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात केला आहे. प्रथम वर्ष कला या वर्गाच्या मराठी विषयाच्या 'समकालीन मराठी कथा' या संपादित पुस्तकामध्ये ही कथा समाविष्ट केलेली आहे. आता नव्याने प्रकाशित झालेल्या त्यांच्या 'शिकार फत्ते झाली' या कथासंग्रहात सुद्धा लेखिकेने 'बाजा' या कथेचा समावेश केला आहे.

उषाकिरण आत्राम यांनी इ.स.१९९६ मध्ये 'अहेर' नावाचा कथासंग्रह लिहून आदिवासी साहित्यात कथा लेखनास सुरुवात केली. आदिवासी काव्याच्या प्रांतात जशा त्या 'म्होरकी' ठरतात. त्याचप्रमाणे एकूण आदिवासी स्त्रियांच्या कथालेखनाची मुहूर्तमेढसुद्धा त्यांनीच रोवलेली दिसते. म्हणून 'अहेर' हा आदिवासी कथासाहित्यातील पहिला कथासंग्रह. लेखिका 'उषाकिरण आत्राम' यांनी 'हाकारा' आदिवासी भारत या मासिकांमधून यापूर्वीही लेखन केलेले आहे. त्यांच्या 'अहेर' या कथासंग्रहामध्ये अहेर, बाजा, जनी, संघर्ष, परिवर्तन आणि भूक अशा एकूण सहा कथांचा समावेश आहे. त्यांच्या 'अहेर' या कथासंग्रहाबाबत प्रस्तावनेमध्ये डॉ. इंदुमती लहाने लिहितात, ''उषाकिरण आत्रामांच्या 'अहेर' कथासंग्रहात गोंडीयन जीवनाचे स्त्रीवादी साहित्याचे सृजनशील चित्रण पाहावयास मिळते. उषाकिरण कथालेखन, कविता लेखन करुनच थांबत नाही तर सामाजिक जाणिवांचे यांना चांगले भान, असल्याने स्त्रियांचे प्रश्नही त्या हाताळताना दिसतात. स्त्रीमुक्तीच्या सक्रीय कार्यकर्त्या, पुरोगामी विचार व सामाजिक जाण असलेल्या लेखिकांमध्ये त्यांची गणना करावी लागेल. 'अहेर'मधील कथा या त्यांच्या जाणिवांच्या स्वानुभवातून केलेल्या यातनांची ही गोळाबेरीज आहे.''[१] डॉ. इंदुमती लहाने यांच्या मतानुसार आत्राम यांचे सामाजिक भान चांगले असल्यामुळे त्यांच्या कथांमधून, स्त्रियांचे हे जीवन वास्तव हुबेहूब चित्रीत केलेले दिसते. उषाकिरण आत्राम यांची भाषाशैली, वातावरणनिर्मिती कथेमध्ये समरस होण्यास भाग पाडते. कवितांबरोबरच कथेच्या प्रांतामध्ये एक महत्त्वपूर्ण नाव म्हणून 'उषाकिरण आत्राम' यांची दखल कथा साहित्याला घ्यावी लागेल यात तिळमात्र शंका नाही.



SHRI PADHAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur Dist.Pune

**कथेचा आशय :**

सावकार आणि जमीनदार, आदिवासींच्याच जमिनी लुबाडून त्यांना गुलाम बनवितात. वेठबिगारीच्या नावाखाली संपूर्ण आयुष्य त्यांच्याकडून काम करून घेतात. तरीही त्यांचे कर्ज फिटत नाही. वर्षानुवर्ष पिढ्यान्‌पिढ्या त्यांच्या अडाणीपणाचा व अज्ञानाचा फायदा घेऊन हे सावकार या आदिवासींच्या आयुष्याचा खेळ मांडतात. उषाकिरण आत्राम यांची 'बाजा' ही कथा सावकार जमीनदार यांच्याकडून होणाऱ्या शोषणावर भाष्य करते.

'बाजा' या कथेतील बेठबिगारीचे चित्रण; सावकार, जमीनदार त्यांच्यातील पशुत्वाची जाणीव करुन देते. सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी 'बाजा' आणि बायको 'लक्ष्मी' दिवसरात्र सावकाराच्या घरी कष्ट उपसत असतात. त्याच्या मुकेपणाचा फायदा घेत सावकार त्याला औताला जुंपतो. प्राण्यापेक्षाही भयानक वागणुक इथे माणसाला मिळते, बाजा आजारी पडतो. कामावर जात नाही, अंगात त्राण नसते, पोटातील भुकेची आग स्वस्त बसू देत नाही. म्हणून धान्य मागण्यासाठी गेलेल्या बाजाला सावकार मारहाण करतो. त्यातच बाजाचा मृत्यू होतो. त्याचे प्रेत डोहात टाकले जाते. त्याचा मुलगा 'पेंटा' मात्र हे सहन करत नाही. तो समाजातील लोकांना आवाहन करतो. सावकाराच्या दडपशाहीविरुद्ध लोक आवाज उठविण्यास तयार होतात आणि सावकाराला पकडून पोलिसांच्या ताब्यात देतात. 'बाजा' कथेसंदर्भात मुक्ता सर्वगोड म्हणतात, ''बाजा कथेत बेठबिगारीचा पाश पिढ्यान्‌पिढ्या कसा कचकचून ठेवतो. आजा-बाप वेठीस राहून मरतो पण सावकारांचे कर्ज खंडता-खंडत नाही. वेळेप्रसंगी वेठबिगारास, एका सावकाराकडून दुसऱ्यास विकून टाकतो. लग्न झालेल्या पोरीसोबत बिगाऱ्याची बायको काम करायला पाठवितो. बैलगाडीचे धावणे, बैल नसला तर चिखल करायला नांगराला जुंपणे. या सारखा वेठबिगारीचा जिवघेणा अत्याचार आणि शोषणाचा शिकारी अज्ञानी गोंड समाज कसा उणाउणा होत जातो. याच यथार्थ चित्रण पहायला मिळतं.''[२]

आदिवासी समाजाला अशा सावकारांच्या कावेबाजपणामुळे जीव गमवावा लागला आहे. ते आदिवासी माणसाला जनावरापेक्षाही खालची वागणूक देतात. एखाद्या माणसाला बैलाबरोबर औताला जुंपावे, याच्यापेक्षा भयानक कष्ट काय असू शकतील? सावकाराच्या निर्दयीपणाचा हा कळसच म्हणावा लागेल.

या कथेतून सावकार, जमीनदार, वाणी, पाटील ह्या आदिवासींच्याच जमिनी लुटून, लुबाडून श्रीमंत झालेल्या माणसाच्या, पशुतुल्य वृत्तीचा चांगला समाचार घेतला आहे. माणसाला प्राण्यांहूनही हीन वागणूक देणाऱ्या सावकारांची, सावकारशाही उलथून टाकण्याचे आव्हान लेखिका या कथेच्या माध्यमातून करते आहे. कथेतील



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE ★ Pabal Tal.Shirur Dist.Pune

संवाद कथेतील प
तर आपल्यासमोर
**घटना- प्रसंग :**
घटना-प्रसंग
घटना-प्रसंग नसत
निर्मितीतून विविध
गुणधर्माची पात्र ए
म्हणतात, ''दोन
विशिष्ट पात्राच्या
निर्माण होतात अ
मतानुसार, घटना
कथेमधून घट
उषाकिरण आत्राम
घटना त्यांच्या क
'बाजा' कथे
त्याच्या अंगावर,
थकला बे? मादरच
कामचोर! मजुरप
तोंड चालवशील त
निर्दयीवृत्तीचे दर्शन
बाजा करतो. परंतु
मारण्याचा आणि
घाव करतो. या
सावकारशाही व्यव
**वातावरणनिर्मिती**
कथेतील वात
अतिशय महत्त्वपूर्ण
काम वातावरणनि
महत्त्वाचे प्रयोजन
निर्माण झालेले अस
''सावकारांनी डोळे
कोठी घराच्या आ

जमिनी लुबाडून त्यांना गुलाम
त्यांच्याकडून काम करून घेतात.
ढ्या त्यांच्या अडाणीपणाचा व
च्या आयुष्याचा खेळ मांडतात.
जमीनदार यांच्याकडून होणाऱ्या

ावकार, जमीनदार त्यांच्यातील
ण्यासाठी 'बाजा' आणि बायको
असतात. त्याच्या मुकेपणाचा
यापेक्षाही भयानक वागणुक इथे
जात नाही, अंगात त्राण नसते,
गून धान्य मागण्यासाठी गेलेल्या
मृत्यू होतो. त्याचे प्रेत डोहात
त नाही. तो समाजातील लोकांना
तोक आवाज उठविण्यास तयार
ध्यात देतात. 'बाजा' कथेसंदर्भात
रीचा पाश पिढ्यान्‌पिढ्या कसा
पण सावकारांचे कर्ज खंडता-
राकडून दुसऱ्यास विकून टाकतो.
करायला पाठवितो. बैलगाडीचे
जुंपणे. या सारखा वेठबिगारीचा
ानी गोंड समाज कसा उणाउणा
''[२]

कावेबाजपणामुळे जीव गमवावा
पेक्षाही खालची वागणूक देतात.
च्यापेक्षा भयानक कष्ट काय असू
च म्हणावा लागेल.
ल ह्या आदिवासींच्याच जमिनी
शुतुल्य वृत्तीचा चांगला समाचार
णाऱ्या सावकारांची, सावकारशाही
माध्यमातून करते आहे. कथेतील

संवाद कथेतील पात्राना जीवंत करण्याचा प्रयत्न करतात. म्हणून कथा पुस्तकात नाही तर आपल्यासमोर घडते, असा भास होत राहतो.

**घटना- प्रसंग :**

घटना-प्रसंग निर्मिती हा घटक कथेच्यादृष्टीने अतिशय महत्त्वाचा घटक आहे. घटना-प्रसंग नसतील तर कथेतील पात्र निर्माण होणार नाहीत. घटना प्रसगांच्या निर्मितीतून विविध पात्राच्या स्वभावाचे गुणविशेष कळतात. त्याचबरोबर विविध गुणधर्माची पात्र एकत्र आल्यावर सुद्धा घटना घडत असतात. या विषयी आनंद यादव म्हणतात, ''दोन किंवा दोनपेक्षा जास्त पात्रे काही प्रसंगाने एकत्र आली की, त्या त्या विशिष्ट पात्राच्या विशिष्ट स्वभावामुळे संघर्ष, समेट, संवाद, विसंवाद किंवा मतभेद निर्माण होतात आणि नव्या घटना प्रसंगाची निर्मिती होते.''[३] आनंद यादवांच्या मतानुसार, घटना आणि पात्र या एकमेकांना पूरक अशा गोष्टी आहे.

कथेमधून घटना-प्रसंगाची निर्मिती योग्य ठिकाणी योग्य वेळी झालेली दिसते. उषाकिरण आत्राम यांच्या कथांमधून घटनेचे पाल्हाळ दिसत नाही. अगदी मोजक्याच घटना त्यांच्या कथेमधून दिसतात.

'बाजा' कथेतील हा प्रसंग अंगावर शहारे आणतो,''सावकार कुत्र्यासारखा त्याच्या अंगावर, येऊन म्हणाला काय झालं? काम कराले नेट लागते? कायन थकला बे? मादरच्योद? एवढ माझं कर्ज तुझ्या बापानी खंडवलं नाही. आणि तू असा कामचोर! मजुरपणा करशील तं, बाजारांत नेवून ईकून टाकीन भडव्याले, ''जास्त तोंड चालवशील तं चाबकानं फोडून काढीन'' (पृ.२५-२६) या प्रसंगातून मालकाची निर्दयीवृत्तीचे दर्शन घडते. आठ दहा दिवस मोठ्या कष्टाने नांगर ओढण्याचे काम बाजा करतो. परंतु या अतिश्रमामुळे तो आजारी पडतो. सावकाराच्या बोलण्याचा, मारण्याचा आणि बैलप्रमाणेच, बैलाबरोबर जुंपण्याचा प्रताप लक्ष्मीच्याही मनावर घाव करतो. या कथेतील घटना प्रसंगाच्या निमित्ताने लेखिका उषाकिरण आत्राम सावकारशाही व्यवस्थेच्या मुर्डादवृत्तीचे दर्शन घडविते.

**वातावरणनिर्मिती:**

कथेतील वातावरणनिर्मिती हा घटक कथेची वाचनीयता वाढविण्याच्यादृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण आहे. लेखकांचा कथाहेतू गांभीर्यपूर्वक वाचकापर्यंत पोहोचविण्याचे काम वातावरणनिर्मिती करत असते. वातावरण निर्मिती हे पात्रनिर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचे प्रयोजन आहे. पात्र आणि प्रदेश यांच्यातील भावनिक, सांस्कृतिक नाते निर्माण झालेले असते त्या नात्याला अर्थपूर्णता देण्याचे काम वातावरण करत असते. ''सावकारांनी डोळे लालपिवळे केले.त्याला त्याने घरात ये, म्हणून हाताने खुणावले. कोठी घराच्या आत एक अंधारी खोली होती. त्यात गव्हाचे पोते, तांदळाचे पोते,



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

तेलाची पिपे, मिठाचे पोते, धान, मोहे गचागच भरुन होते. आत एक लहानशी खिडकी होती. आत अंधारगप्प होता. त्या खोलीत ना सूर्य प्रकाश यायचा ना खोलीतला आवाज बाहेर जायचा. बाजाच्या मनात आशेचा फ्लोरा फुलला. सावकाराने आत बोलावले.'' (पृ.३१) या कथेतील हा वातावरण निर्मिती करणारा भाग कथेला प्रवाहित करण्यास खूपच महत्त्वपूर्ण ठरतो.

पात्रनिर्मितीसाठी वातावरणाचा सहभाग, महत्त्वपूर्ण ठरतो. पात्रनिर्मिती प्रमाणेच कथेतील घटना- प्रसंग, संवाद, संघर्ष, निवेदन, भाषाशैली यांच्या निर्मितीतसुद्धा वातावरणाचा महत्त्वपूर्ण वाटा असतो. घराचे वर्णन, रस्त्याचे वर्णन, निसर्गाचे वर्णन पशू- पक्षी, प्राण्याचे वर्णन किंवा एखाद्या व्यक्तीचे वर्णन या वर्णनातून, वातावरणातून कथा आकार घेऊ लागते. म्हणून वातावरणामध्ये सर्वच घटकांचा कमी-अधिक सहभाग आहे.

**संवादः**

कथेतील इतर घटकांप्रमाणेच संवाद हा महत्त्वपूर्ण घटक आहे. संवाद कथेला जिवंतपणा आणून देण्याचे काम करतो. संवाद आणि निवेदन हा वेगळा- वेगळा भाग आहे. संवादाची प्रमाणबद्धता कथेची उंची वाढविते. त्याचप्रमाणे संवादाचा अतिरेक कथेला रंजनप्रधान बनवितो. संवादाचा मुख्य हेतू पात्रनिर्मिती करणे हा असतो. पात्राच्या संवादातून त्याचे गाव त्याचा परिसर, त्यांची सांस्कृतिक जडणघडण, त्याचे शिक्षण त्याचा आर्थिक स्तर, त्यांची मनस्थिती व्यक्त होत असते. ना.सी.फडके म्हणतात, ''केवळ संवादासाठी संवाद लघुकथेत चालत नाही त्यांना स्वतंत्र स्थान नाही. निवेदनाचं एक चटकदार साधन म्हणुनच संवादाचा उपयोग कथालेखकांनी करायला हवा. प्रसंग किंवा स्वभाव यांच्या रेखाटनासाठीच संवाद लिहिले गेले पाहिजेत. कथानक पुढे ढकलण्याचं किंवा पात्राच्या स्वभावातलं वैशिष्ट्य अधिकाधिक स्पष्ट करण्याचे काम संवादानी केले पाहिजे. याचाच अर्थ असा की संवादात गती असायला हवी.''[४] निश्चितच ना.सी.फडक्यांच्या मतानुसार संवादातील गतीमुळेच कथा प्रवाही होण्यास मदत होते.

कथांमधून व्यक्त होणारे संवाद व्यक्ती प्रसंग व कथागत भाववृत्तीशी सुसंगत असले पाहिजेत. संवादमाधुर्य खटकेबाजपणा हे संवादातील महत्त्वाचे गुण आहेत. हे गुण सांभाळून केलेली संवाद रचना निश्चितच प्रभावी ठरते.

'बाजा' या कथेतील खालील संवादनिर्मिती, नवऱ्याच्या अचानक गायब होण्यामुळे लक्ष्मीची झालेली मनाची घालमेल रेखाटते. '' मालक मुका कोठी हाये जी? ''

तिने भितभितच विचारले, ''मले का मालूम? मी का पाहित राहतो का! कोठे



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE
Pabal
Tal. Shirur,
Dist. Pune.

गेला म्हणतात,''
तो बसकत
जातो. म्हणून घरी
''नं तू मले
बाजा या क
संवादातून लक्ष्मीच
निश्चित वर म्हटल
संवादावरून दिसून
अशाप्रकारे,
उंचीवर घेऊन जात
बोलीभाषेतील संवा
**पात्र–व्यक्तिरेखा**
कथानक, संव
घटक अनन्यसाधार
म्हणून येत नाही, त
त्याचे विचार त्याच्य
अवतरत असतात या
पात्रानाही महत्त्व अ
हेतूला दिशा देतात
पेच निर्माण करतात.
त्या पात्रांना सजीव
सारखेच महत्त्व अस
शेवटी पात्र म्ह
व्यक्तिची शब्दरुप प्र
सिद्ध होत जाते. पा
बाह्य वैशिष्ट्यांना वि
जात होते. परंतु पात्रा
होत गेलेली पाहायला
येत नाही. त्यामुळे व
साकारणे ही कथा ले
बाजा या कथेती
वडिलांच्या मृत्युसंदर्भा

गेला म्हणतात,''

तो बसकत ओरडला. ती अडखळत म्हणाली, '' इकडेचं तं, तुमच्याकड जातो. म्हणून घरी पोरायले सांगून आला''

''नं तू मले इच्यारते व, लई शायनी हायेल नं?''(पृ.३२)

बाजा या कथेतील लक्ष्मी आणि जमीनदाराशी झालेला हा संवाद आहे. या संवादातून लक्ष्मीची मालकाबद्दलची भिती व मालकाचा उर्मटपणा दिसून येतो. निश्‍चित वर म्हटल्याप्रमाणे संवादातून पात्राच्या मानसिकतेची ओळख होते, ते या संवादावरून दिसून येते.

अशाप्रकारे, आदिवासी स्त्रियांच्या कथेमधील संवाद कथेला एका वेगळ्या उंचीवर घेऊन जातात. त्या- त्या परिसरानुसार त्या- त्या पात्राच्या तोंडी त्याच बोलीभाषेतील संवाद, त्यातील खडकेबाजपणा कथेला प्रवाही करण्यास मदत करतो.

**पात्र–व्यक्तिरेखा :**

कथानक, संवाद, निवेदन, वातावरण या घटकांप्रमाणेच पात्र व्यक्तिरेखा हा घटक अनन्यसाधारण व महत्त्वपूर्व घटक आहे. कथेतील पात्र फक्त व्यक्तिचित्रण म्हणून येत नाही, तर त्या पात्राचा स्वभाव, त्याची वृत्ती- प्रवृत्ती त्याच्या कल्पना, त्याचे विचार त्याच्या जीवनाचे खास वैशिष्ट्ये, जीवनपद्धती या एकसंघतेतून ती पात्र अवतरत असतात या संदर्भात डॉ. द.ता. भोसले म्हणतात, ''कथेमध्ये कथानकाइतकेच पात्रानाही महत्त्व असते कथेतील पात्र कथानकाला गतीशील बनवितात. लेखकाच्या हेतूला दिशा देतात त्याला अधिक गहिरा रंगही देतात. कथेतील पात्रेच कथानकात पेच निर्माण करतात. कथेतील पात्रेच नवीन प्रसंगाना जन्म देतात आणि ते प्रसंगच त्या पात्रांना सजीव आणि प्रत्ययकारी बनवितात.''[५] कथानकाला आणि पात्रांना सारखेच महत्त्व असते, असे डॉ. द.ता. भोसले यांचे मत आहे.

शेवटी पात्र म्हणजे तरी काय? कथा–कादंबरीमधून शब्दातून साकारलेली एक व्यक्तिची शब्दरुप प्रतिमा! तिच्या कथेतील स्थानावरुन तिचे प्रधानत्त्व व गौणत्त्व सिद्ध होत जाते. पात्राचे चित्रण वेगवेगळ्या पद्धतीने केले जाते. पूर्वी व्यक्तीच्या बाह्य वैशिष्ट्यांना किंवा घटक घटकांवरच पात्राचे विशिष्ट बाह्यस्वरुपच रेखाटले जात होते. परंतु पात्राच्या अंतर्मनातील चित्रण आल्यापासून कथा अधिकाधिक समृद्ध होत गेलेली पाहायला मिळते. मोजक्याच कालखंडामध्ये पात्राचे संपूर्ण जीवन रेखाटता येत नाही. त्यामुळे कथेचा आशय लक्षात घेऊन योग्य पद्धतीने रेखीव व्यक्तित्त्व साकारणे ही कथा लेखकांची खरी कसोटीच असते.

बाजा या कथेतील 'पेन्टा' हा बाजाचा मुलगा लढाऊवृत्तीचा आहे. आपल्या वडिलांच्या मृत्युसंदर्भात तो गावातील लोकांना जागृत करून सावकाराला पोलीसांच्या

होते. आत एक लहानशी खिडकी
प्रकाश यायचा ना खोलीतला
लोरा फुलला. सावकाराने आत
ती करणारा भाग कथेला प्रवाहित
पूर्ण ठरतो. पात्रनिर्मिती प्रमाणेच
भाषाशैली यांच्या निर्मितीतसुद्धा
रस्त्याचे वर्णन, निसर्गाचे वर्णन
र्णन या वर्णनातून, वातावरणातून
सर्वच घटकांचा कमी–अधिक
पूर्ण घटक आहे. संवाद कथेला
निवेदन हा वेगळा- वेगळा भाग
त्याचप्रमाणे संवादाचा अतिरेक
पात्रनिर्मिती करणे हा असतो.
ी सांस्कृतिक जडणघडण, त्याचे
क्त होत असते. ना.सी.फडके
ालत नाही त्यांना स्वतंत्र स्थान
संवादाचा उपयोग कथालेखकांनी
टनासाठीच संवाद लिहिले गेले
स्वभावातलं वैशिष्ट्य अधिकाधिक
च अर्थ असा की संवादात गती
मतानुसार संवादातील गतीमुळेच
व कथागत भाववृत्तीशी सुसंगत
ादातील महत्त्वाचे गुण आहेत. हे
ावी ठरते.
ी, नवऱ्याच्या अचानक गायब
टते. '' मालक मुका कोठी हाये
' मी का पाहित राहतो का! कोठे

SHRI PADMAMANI ... COLLEGE Pabal Tal.Shirur Dist.Pune.

ताब्यात देतो. लहान वयातच त्याचे येवढे मोठे, धाडस आदिवासींच्या नव्या शिक्षित पिढीला निश्चितच प्रेरणा देऊन जाते. बाजा, लक्ष्मी, पेन्टा, रामद्र्या, सावकार या कथेतील व्यक्तिरेखा प्रमुख आहेत. या प्रमुख व्यक्तिरेखांच्या बरोबरच काही गौण व्यक्तिरेखा कथेमधून दिसतात.

**निवेदन :**

कथेला प्रवाही करण्याचे काम, आकार देण्याचे काम निवेदक करत असतो. 'बाजा' कथेतील पुढील निवेदन, ''बाजाला आपल्यावरील अन्याय अत्याचार होणारा छळ, पिळवणूक कुणाला तरी सांगावी वाटे, तो आतल्या आत तडफडायचा त्याच्या मनाचा आक्रोश अहोरात्र सुरु असायचा पण आतला आवाज आतला आक्रोश, आतल्या आत दबुन जायचा. त्याचे नाव 'बाजा' होते. परंतु हा हाडामासाचा बाजा आयुष्यांत कधीच वाजला नव्हता. त्याचा सूर आतल्या आतच दडपला गेला होता.'' (पृ.२८) बाजा हे प्रतिकात्मक नाव लेखिकेने योजले आहे. या निवेदनातून बाजा स्वतःशीच संवाद साधतो आहे.

कथेमधील, निवदेनातून आपल्याला तृतीयपुरुषी निवेदक भेटतो. कथा प्रवाही होण्यामध्ये निवेदनाची भूमिका महत्त्वाची ठरते.

**भाषा :**

कथा लेखकासमोर कथेचे लेखन करतांना भाषाशैलीचे एक वेगळे आव्हान असते. कथा ज्या ठिकाणी घडते ते ठिकाण, तो परिसर थोडक्यात तेथील भौगोलिक, सांस्कृतिक गोष्टीचा विचार करून, ती भाषा त्या पात्राच्या तोंडून, संवाद रुपात घालायची असते. कथेच्या जिवंतपणासाठी भाषाशैली हा घटक अत्यंत महत्त्वाचा ठरतो. कथा ही भाषाच्या माध्यमातूनच आकाराला येत असते. कथेची भाषाही कल्पित विश्वाची भाषा असते. ते कल्पित विश्वत स्वतः लेखकाने त्यांच्या अनुभवाच्या जोरावर निर्माण केलेले असते.

उषाकिरण आत्राम यांच्या कथेतून आलेली भाषा निसर्गाचे सौंदर्य घेऊन येते. आदिवासींची संस्कृती घेऊन घेते, आदिम प्रतिमांचे ऋण घेऊन येणारी वापर करणारी ही भाषा आदिवासी लेखिकांच्या स्वतंत्र अस्तित्त्वाची जाणीव करुन देणारी आहे. कथेमधून येणाऱ्या पात्रांना घडणाऱ्या घटनांना उठावपणा देण्यास निश्चितच ती यशस्वी ठरते.

निसर्गवर्णन आणि काव्यात्मवर्णनाबरोबर त्यांच्या कथेमधून आदिम प्रतिमा जाणवतात. उदा. सूर्याचे फूल, काळोखाच्या झाडावर, रोवण, ढोलक्या, पाऊस पेल्याले शरीर, पिकलेल्या फळासारखे, कडू काटयासारखे, दावणीच्या बैलासारखे, कडू कांदयासारखे. अशा आदिम प्रतिमा उषाकिरण आत्राम यांच्या कथेत आढळतात.



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal. Shirur, Dist. Pune

त्र आदिवासींच्या नव्या शिक्षित
, पेन्टा, रामद्रया, सावकार या
तरेखांच्या बरोबरच काही गौण

चे काम निवेदक करत असतो.
वरील अन्याय अत्याचार होणारा
ल्या आत तडफडायचा त्याच्या
ला आवाज आतला आक्रोश,
ते. परंतु हा हाडामासाचा बाजा
आतल्या आतच दडपला गेला
ने योजले आहे. या निवेदनातून

ची निवेदक भेटतो. कथा प्रवाही

भाषाशैलीचे एक वेगळे आव्हान
सार थोडक्यात तेथील भौगोलिक,
पात्राच्या तोंडून, संवाद रुपात
शैली हा घटक अत्यंत महत्त्वाचा
ला येत असते. कथेची भाषाही
ततः लेखकाने त्यांच्या अनुभवाच्या

भाषा निसर्गाचे सौंदर्य घेऊन येते.
ऋण घेऊन येणारी वापर करणारी
याची जाणीव करुन देणारी आहे.
उठावपणा देण्यास निश्चितच ती

यांच्या कथेमधून आदिम प्रतिमा
गाडावर, रोवण, ढोलक्या, पाऊस
यासारखे, दावणीच्या बैलासारखे,
आत्राम यांच्या कथेत आढळतात.

तसेच सालच्या वाळू घालणे, तोंडाला तोंड देणे, मुठ्ठी शिवशिवणे, डोळे लालपिवळे होणे, घश्याला कोरड पडणे. अशा प्रकारचे वाक्प्रचार या कथेतून येतात.

**कथा आरंभ:**

कथा साहित्यप्रकारामध्ये इतर घटकांप्रमाणेच कथेचे रचनातंत्र हा घटक महत्त्वपूर्ण आहे. कथाचे कथानक चांगले असले, त्याची वातावरणनिर्मिती चांगली केली. भाषाशैली अनुरुप वापरली परंतु कथेच्या रचना तंत्रात जर बिघाड झाला, मांडणी जमली नाही. तर बाकीच्या सर्व गोष्टी चांगल्या असून कथा फसते. म्हणून कथा लेखकाने मांडणीकडे लक्ष दयायला हवे, कथेची रचना एकाच अशा विशिष्ट पद्धतीने, झालेली नसते. कथाकाराला कथेच्या रचनातंत्राचा अभ्यास करुन काही संकेतांच्या अनुशंगाने कलात्मक मांडणी करावी लागते.

कोणत्याही गोष्टीची सुरुवात चांगली झाली तर तिचा शेवट चांगला होतो. म्हणतात ना, 'Well Begining is half done' या म्हणीप्रमाणे कथेची सुरुवात चांगली झाली तर निम्मे काम फत्ते होते. कथेची सुरुवात आकर्षक असेल तर वाचक कथेत सहजपणे आकर्षित होते. कथेच्या प्रारंभा संदर्भात ना. सी.फडके यांचे मत महत्त्वपूर्ण आहे. ते म्हणतात, ''प्रारंभ करताना दोन अवधानं तुम्ही सांभाळायला हवीत. एक अवधान असं की, तुम्ही प्रारंभ प्रसंगाच्या किंवा स्वभावाच्या वर्णनानं करा किंवा संवादानं करा, पण तो असा असायला हवा की, तो मजकूर वाचल्याबरोबर वाचकाच लक्ष एकदम खेचलं गेलं पाहिजे आणि 'पुढे काय आहे ते पाहू या' अशी उत्कंठा त्याला वाटली पाहिजे. टेनिसच्या खेळात सर्व्हिसंचे महत्त्व असतं तेच गोष्टींच्या प्रारंभाचं असतं असं समजा.''[६]

या कथेचा प्रारंभ हा ''सावकाराच्या वाड्यापुढे सकाळपासूनच गर्दी होती. जमाव पांगता पांगत नव्हता. पटांगणात डोहातून काढून आणलेले प्रेत, पोत्यात बांधून कडूलिंबाच्या पाल्यात एका चादरीवरती टाकलेले होते.'' अशा उत्कंठावर्धक पद्धतीने झालेला आढळतो. त्यामुळे कथा वाचण्याची आतुरता वाढत जाते.

**कथेचा शेवट :**

कथेच्या प्रारंभ, मध्य, यासारखाच शेवटही उत्कंठा वर्धक असावा. त्याची परिणामकारकता वाचकाला जाणवावी. कथा वाचतांना अवस्थ असणारा वाचक कथेच्या शेवटी काहीतरी हाताला लागावे, या आशेने वाचत असतो. त्याची अपेक्षापूर्ती करणारा शेवट असावा. कथेचा शेवट हा कथेमध्ये चाललेल्या संघर्षाची द्वंद्वांची उकल असते. त्यातून त्यांची उत्कंठा जितकी तीव्र असते. तितकीच ही शेवटाची तीव्रता जाणवायला हवी. '' 'आम्ही लढाई जिंकली' म्हणत रेला गात सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला. काळोखातून सूर्य निघाला. पेन्टा काळोखाच्या



SHRI PADMA... COLLEGE
Pabal
Tal.Shirur,
Dist.Pune.

फांदीवरचे एक सूर्यफुल झाला' हरवलेल्या मुक्या बाजाचा सुर, पुन्हा पुन्हा पेंटाला स्फूर्ती देवू लागला.'' पृ.३३. कथेची उकल, आशावाद या शेवटच्या वर्णनातून आपल्याला पाहावयास मिळतो.

**शीर्षकाची यथार्थता :**

कथालेखक कधी-कधी शीर्षक अगोदर देतात आणि त्या शीर्षकाभोवती कथेचे कथानक, कथाबीज त्याला सापडत जाते. तर कधी- कधी कथापूर्ण होते, कथेचा आशय मांडून होतो. परंतु योग्य असे शीर्षक त्या कथेला सूचत नाही. मग कथा हेतू लक्षात घेऊन, कथेची मध्यवर्ती कल्पना लक्षात घेऊन कथाकार कथेला शीर्षक देत असतो. अर्थात कथेचे शीर्षक ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. कोणत्याही साहित्यकृतीचे शीर्षक जर समर्पक असेल तर त्या कलाकृतीकडे वाचक आकर्षित होतो. कारण शीर्षकावरूनच त्या कलाकृतीमध्ये काय सामावले आहे. याचा वाचक अंदाज घेत असतो.

त्यांची 'बाजा' ह्या कथेचे शीर्षकही प्रतिकात्मक आहे. त्याचे नाव बाजा आहे. परंतु तो 'मुका' आहे. त्याला बोलता येत नाही. लेखिका म्हणतात, ''त्याचे नाव 'बाजा होते' परंतु हा हाडामासांचा बाजा आयुष्यात कधीच वाजला नव्हता.''(पृ.२८) अशा प्रकारे हे प्रतिकात्मक नाव या कथेला अतिशय साजेसे आहे.

**निष्कर्ष :**

१. बाजा ही कथा जमीनदार, सावकार यांच्या भोगवादी वृत्तीवर भाष्य करते.

२. ही कथा समाजातील रूढी- परंपरा, अंधश्रद्धा, वेठबिगार यांना वाचा फोडणारी आहे.

३. बाजा ही कथा, आदिवासींचे जीवन-वास्तव रेखाटते.

४. अन्यायाविरूद्ध संघर्ष हा या कथेचा आत्मा आहे.

५. आदिवासी माणसांचे कष्टमय जीवनावर कथा भाष्य करते.

६. सावकार व जमीनदार यांच्या निष्ठूरपणावर भाष्य करते.

७. प्रस्थापित समाजाच्या वैचारिक दुबळेपणावर भाष्य करते.

८. अनेक आदिमतेचे संदर्भ या कथांमधून येतात.

९. आदिवासींच्या पुढील पिढ्यांमध्ये आत्मभान आल्याचे दिसते.

१०. आदिवासी कथा सावकारशाही, जमीनदारपद्धती उलथून टाकण्याचे आवाहन करते.

११. पात्र, प्रसंग, घटनांची गुंफण योग्यरित्या केल्यामुळे कथा वाचनीय झाली आहे.



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.
PRINCIPAL
Shri Padmamani Jain
Arts & Commerce College
Pabal,Tal.Shirur,Dist.Pune.412403

१२. कथेच
१३. वाताव
१४. कथेती
१५. आदिव

**संदर्भ :**

१. इंदुमती लहा
१९९६. पृ.१
२. मुटाटकर राम
पृ.२९
३. गायकवाड श
प्र.आ.२००२.
४. फडके ना.सी.
मुंबई प्र.आ.
५. भोसले द.ता.,
प्रकाशन, पुण
६. फडके ना.सी.,
मुंबई प्र.आ. १

ा सुर, पुन्हा पुन्हा पेंटाला
ाद या शेवटच्या वर्णनातून

ा त्या शीर्षकाभोवती कथेचे
कधी कथापूर्ण होते, कथेचा
सूचत नाही. मग कथा हेतू
कथाकार कथेला शीर्षक देत
हे. कोणत्याही साहित्यकृतीचे
चक आकर्षित होतो. कारण
े. याचा वाचक अंदाज घेत

क आहे. त्याचे नाव बाजा
. लेखिका म्हणतात, "त्याचे
आयुष्यात कधीच वाजला
या कथेला अतिशय साजेसे

भोगवादी वृत्तीवर भाष्य करते.
श्रद्धा, वेठबिगार यांना वाचा

त्र रेखाटते.
आहे.
था भाष्य करते.
भाष्य करते.
र भाष्य करते.
ात.
ान आल्याचे दिसते.
द्धती उलथून टाकण्याचे आवाहन

त्यामुळे कथा वाचनीय झाली

१२. कथेच्या हेतूनुसार कथेमधील घटना-प्रसंगाची निर्मिती झाली आहे.
१३. वातावरणनिर्मितीचाही प्रभावी वापर केला आहे.
१४. कथेतील संवाद कथेची उंची वाढवितात.
१५. आदिवासी कथा, कथातंत्राला झुगारताना दिसते.

**संदर्भ :**


१. इंदुमती लहाने, 'अहेर', गोंडवाना- गोंडी साहित्य परिषद, नागपूर प्र.आ. १९९६. पृ.१-२
२. मुटाटकर रामचंद्र, (संपा.) 'हाकारा', त्रैमासिक, पुणे, ऑक्टो- डिसें,१९९६ पृ.२९
३. गायकवाड शाम, 'कथाकार राजन खान', अक्षरमानव प्रकाशन, पुणे प्र.आ.२००२. पृ.२११.
४. फडके ना.सी., 'लघुकथालेखन मंत्र आणि तंत्र', अंजली प्रकाशन लिमिटेड, मुंबई प्र.आ. १९५२. पृ. १४५
५. भोसले द.ता., 'कथागौरव', संपा, डॉ. शेळके, डॉ. गुंजाळ, स्नेहवर्धन प्रकाशन, पुण; प्र.आ. ७ जुलै २००९. पृ. १६
६. फडके ना.सी., 'लघुकथालेखन मंत्र आणि तंत्र', अंजली प्रकाशन लिमिटेड, मुंबई प्र.आ. १९५२. पृ. १२०-१२१


ଓଓ

PRINCIPAL
Shri Padmamani Jain
Arts & Commerce College
Pabal,Tal.Shirur,Dist.Pune.412403